भुसंपादन अर्ज क्र. ७८०/२००९
दस्तगीर वि. महाराष्ट्र व इतर
नि. नं. ६१.



**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. २– शांत विश्वनाथ बरबडे यांची शपथेवर उलटतपासणी गैरअर्जदार क्र. १ व २ यांच्यातर्फे श्री.एस.एम.देशपांडे, सहाय्यक सरकारी वकील साहेब.**

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, मी सरकार मान्यताप्राप्त मुल्यांकनकार असल्याबाबतचे मुळ कागदपत्रं मी आज आणले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझे मुळ डिग्री प्रमाणपत्र देखील मी आणले नाही. या जमीनीच्या चतु:सिमेअंतर्गत कुणाचं एन.ए. ले–आऊट झालं होतं हे मला माहिती नाही. एन.ए. ले–आऊट कुणाचं कुठंपर्यंत आलं होतं याची चौकशी करुन मी अहवाल दिलेला नाही. जेव्हा मला मुल्यांकन करण्याबाबत सांगण्यात आले तेव्हा ती जमीन संपादीत झाली होती. मी शासनाला माझ्या स्थळतपासणीबाबत कळविले नाही. मुल्यांकन करण्याबाबत मला अर्जदाराने पत्र दिले होते परंतु ते मी माझ्या अहवालासोबत जोडले नाही तसेच ते या प्रकरणात दाखल देखील नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा देखील या प्रकरणात दाखल करण्यात आलेला नाही.

प्रश्न :– एखादया जमीनीचे ले–आऊट करायचे झाल्यास १/३ जमीन ही रस्ते, ग्रीन बेल्ट, इत्यादी कामासाठी सुरक्षित ठेवावी लागते ?

उत्तर :– एक एकरच्या पुढं जमीन असेल तर तसे करावे लागते. आणि मुल्यांकन अहवालामध्ये आपण ३३ टक्के जागा सोडलेली आहे.

हे म्हणणे खरे आहे की, माझा मुल्यांकन अहवाल **निशाणी क्र. ५०** मध्ये एकुण १६ प्लॉट दाखविण्यात आले असुन त्यामध्ये मोकळी जागा सोडल्याचे दाखविण्यात आले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुल्यांकन अहवालामध्ये सर्वे नंबर ३१ च्या चतु:सिमा सांगीतलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मी स्थळपाहणी केली होती हे दर्शविणारा एकही कागद या प्रकरणात दाखल करण्यात आलेला नाही. हे

म्हणणे खरे आहे की, माझा मुल्यांकन अहवाल कधी कुणाला देण्यात आला होता याचा देखील उल्लेख त्या अहवालावर नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुल्यांकन अहवालावर जावक क्रमांक नाही. ज्या व्यक्तीने माझ्याकडुन मुल्यांकन अहवाल घेवुन गेला त्याची ॲकनॉलेजमेंट माझ्याकडे असलेल्या मुल्यांकन अहवालाच्या स्थळप्रतवर नाही.

**०५.** मी रेडी रेकनर पाहिलेले नाही. माझ्या मुल्यांकन अहवालासोबत कोणतेही खरेदीखत जोडण्यात आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या स्थळपाहणीच्या वेळेस तेथे कोण–कोण हजर होते याचा देखील उल्लेख माझ्या मुल्यांकन अहवालात नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १०/१०/१९९४ रोजी बाजारभाव काय होता त्याचा देखील कागद मी माझ्या मुल्यांकन अहवालामध्ये जोडला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला जमीनीची कागदपत्रं दाखविल्यास मी जागेवर बसुन मुल्यांकन अहवाल तयार करु शकतो.

प्रश्न :– तुम्ही दिलेला मुल्यांकन अहवाल नविन दिसतो आणि भुसंपादन संदर्भ अर्ज निशाणी क्र. १ वरील कागद फार जुना दिसतो ?

उत्तर :– मी त्याला मुल्यांकन अहवाल दिला होता तो त्याने हरवला म्हणुन मी त्याला नविन अहवाल दिला.

सन १९९४ साली टाईपरायटर होते संगणक नव्हते. हा नविन मुल्यांकन अहवाल मी ज्याच्या आधारे दिला आहे तो कागद माझ्याकडे घरी आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो कागद मी आज आणला नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराला मदत व्हावी म्हणुन मी चुकीचा मुल्यांकन अहवाल तयार करुन जास्तीची किंमत दाखविली आहे.

**भुसंपादन अर्ज क्र. ७८०/२००९**
**दस्तगीर वि. महाराष्ट्र व इतर**
**नि. नं. ६१.**



**०६.** हे म्हणणे खरे आहे की, सन १९९४ साली उमरगा येथे एम.आय.डी.सी. नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुल्यांकन अहवालामध्ये असे नमुद आहे की, सन १९९४ साली उमरगा येथे एम.आय.डी.सी. होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष दिली आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KETANKUMAR UTTAM TELGAONKAR
Date: 2026.02.16 16:41:05 +0530

**(केतनकुमार तेलगांवकर)**

**दिनांक १६/०२/२०२६.** **सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, उमरगा.**